# First Unit Test : AUGUST - 2022

**Std.: X** **MARATHI** **M.Marks : 10**

कृति ः 1. पूढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती कराः

(1) (i) आकृती पूर्ण कराः (02)




(i) योग्य पर्याय निवडा ः (01)

चिंधीला शाळा शिकण्यास मनाई होती ; कारण ......

(अ) चिंधी घरात सर्वांत मोठी होती.

(ब) त्यांच्या घरातील कुणीही यापूर्वी शाळेची पायरी चढले नव्हते.

(क) ती आईबाबांची लाडकी होती.

मी रोज म्हशी घेऊन शाळेसमोरून जात असे. त्या शाळेचं नाव होतं, 'बुनियादी ग्रामशाळा, पिंपरी (मेघे), आर्वी रोड, जि. वर्धा ' शाळा म्हणजे एक भला मोठा हॉल होता. धान्य ठेवायला गोडाऊन बांधतात तसा, वर कौलं असलेला. समोर एक छान, भलंमोठं चाफ्याचं झाड होतं. त्याची टपोरी, पांढरीशुभ्र फुलं शाळेच्या अंगणात पडलेली असायची. म्हशी घेऊन जाताना शाळेपाशी आले, की मी म्हशी घेऊन शाळेपुढे थांबत असे. शाळेत जाणाऱ्या मुली चांगले कपडे घालून, वेणी-फणी करून शाळेसमोर खेळत असायच्या. काहीजणी झाडाखाली बसून अभ्यास करीत असायच्या. तेव्हा मला वाटायचं... 'आपणपण शाळेत जावं.' मी एकदा अण्याजींना म्हटलं, "अण्याजी, मला शाळेत जाऊन शाळा शिकायचीय." चुलीपुढं बसून भाकरी करणाऱ्या आईनं हे ऐकलं अन् ती तरातरा बाहेर आली. "चिंधे, काय म्हणालीस? ... शाळेत जायचं ... अन् रोज म्हशी कोण सांभाळील? आपल्या साठेच्या घराण्यात अजून कुणी शाळेची पायरीसुद्धा चढलं नाही... अन् शाळेत जायचं म्हणती शहाणी !" अण्याजी आईचं ऐकत होते ; पण काहीच बोलत नव्हते.

(2) लेखिकेच्या आई ने लेखिकेला शाळेत शिकण्यासाठी मनाई केली-याबद्दलचे तुमचे मत लिहा. (03)

**कृति ः 2. पुढील कवितेच्या आधोर सुचनांनुसार कृती करा ः** **[04]**

(1) उत्तरे लिहा ः (02)

(i) नारळाच्या आतमध्ये असणारे .......................................................

(ii) अभंगात उल्लेखलेली फुले व फळे , ..................... , .................

| | |
|---|---|
| केकतीला काटयांचे वेढे।<br>भितरीं निपजती केवडे।<br>तैसे साधूचे शब्द गाढे।<br>परोपकारलागीं ।।<br>फणस सर्वांगी कांटवले।<br>भितरी महा गोडीनें कोंदले।<br>तैसें साधुहृदय जालें।<br>बोधासंगे परियेसा।। | नारळ कठीण दिसे बाहेर।<br>भितरी खोबरें अरुवार।<br>तैसें साधूचें अंतर।<br>बोधें वोसंडले।।<br>ऐसा सद्‌गुरुशीं धरा भाव।<br>तो कैसा करावा उपाव।<br>शेखमहंमद सांगती सेव।<br>सभे श्रोत्यांप्रती।। |

(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा. (02)

केकतीला काटयांचे वेढे।
भितरीं निपजती केवडे।
तैसे साधूचे शब्द गाढे।
परोपकारलागीं ।।

******